| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २०५ वा | रविवार दिनांक २६ ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### मोटारसायक पिकअप धडकेत एकाचा मृत्यू

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत श्रीहरी भानुदास जाधव, वय ६३ वर्षे, रा. चिखली ता.जि. धाराशिव हे दि.१३.१०.२०२५ रोजी बुलेट मोटरसायकलवरुन जात होते. दरम्यान रुईभर पाटीचे पुढे अभिजीत माने यांचे शेताजवळ पिकअप चा चालक नामे- सुरज उर्फ विशाल कांबळे रा. बरमगाव बु. ता. जि. धाराशिवे यांनी त्याचे ताब्यातील पिकअप हा चालवून अचानक यु टर्न करुन श्रीहरी जाधव यांचे बुलेट मोटरसायलकला धडक दिली. या अपघातात श्रीहरी जाधव हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी प्रविण श्रीहरी जाधव, वय ३५ वर्षे, रा. शामल निवास बसवेश्वर चौक लातुर ता. जि. लातुर यांनी दि.१८.१०.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### मोटारसायकल पळवली

वाशी (प्रतिनिधी) पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शितल प्रमोद पोपळे, वय २८ वर्षे, रा. बीड ता. जि. धाराशिव हे व त्याचे पती दि.२३.१०.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान पारगाव टोलनाक्याचे पुढे तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीचे पाठीवरील शॉक ओढुन फिर्यादी त्यांचे पती यांना खाली पाडून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन चाकुचा धाक दाखवून फिर्यादीचे दागिने काढत असताना फिर्यादीचे पतीने ट्रव्हल्स का थांबवली म्हणून ट्रव्हल्सवर दगड फेक करुन फिर्यादी यांचे मोटरसायकल अंदाजे ४०,००० किंमतीची घेवून पळून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शितल पोपळे यांनी दि.२४.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९(४), १२५,३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### दिडलाखाचा एवज घेवुन महिला मोटारसायकलवरून पसार

वाशी (प्रतिनिधी) वाशी पोलीस ठाणे :फिर्यादी नामे- सागर गोविंद शिंदे, वय ३९ वर्षे, रा. प्लॉट नं ०९ शिवपार्वती सोसायटी सहारा चौक गोंधळे नगर, हडपसर पुणे ता हवेली जि. पुणे दि.१५.१०.२०२५ रोजी १०.३० वा. सु. आंद्रुड फाटा येथे रोडवर अनोळखी पुरुष व महिला यांनी सागर शिंदे यांचे रोख रक्कम १,५०,००० सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण २,१०,००० माल अनोळखी महिलाने हिसकावून घेवून मोटरसायकलवर बसून निघून गेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सागर शिंदे यांनी दि.२४.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०४(२), ३ (५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### चांदीच्या दागिण्याची चोरी

उमरगा (प्रतिनिधी) पोलीस ठाणे :फिर्यादी नामे- सुहास रमेश पोतदार, वय ४७ वर्षे, रा. सोनार गल्ली मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव यांचे कदेर येथील कालीका ज्वेलर्स दुकानाचे शटर अज्ञात व्यक्तीने दि.२४.१०.२०२५ रोजी ००.०१ ते ०३.४५ वा. सु. उचकटुन आत प्रवेश करुन लोखंडी कपाटातील ३७३० किग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने एकुण २,२९,४८७ किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुहास पोतदार यांनी दि.२४.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकल धडकेत एकाचा मृत्यू

नळदुर्ग (प्रतिनिधी) पोलीस ठाणे मयत नामे-संजय संतराम राठोड, व सोबत फिर्यादी नामे- प्रविण संतराम राठोड दोघे रा. वडाचा तांडा व्होर्टी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.२३.१०.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान मुर्टा शिवारातील सत्यवान सुरवसे यांचे गुळाचे कारखान्याजवळ कॅम्पर चार चाकी गाडी क्र एमएच १४ सीडी ०११८ चा चालकाने त्याचे ताब्यातील कॅम्पर हे हायगयी व निष्काळजीपणे चालवून संजय राठोड व प्रविण राठोड यांचे मोटरसायकल धडक दिली. या अपघातात संजय राठोड हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर प्रविण राठोड ये किरकोळ व गंभीर जखमी झाले.

नमुद कॅम्पर चालक हा अपघाताची माहिती न देता कॅम्पर जागेवर सोडून निघून गेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रविण राठोड, यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१, १०६ (१), १२५ (अ)(ब) सह मपोका कलम १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## धाराशिवकरांसाठी मोठा दिलासा: शहरातील रस्त्यांच्या कामांना कार्यारंभ आदेश

### लवकरच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन- आमदार राणाजगजितसिंह पाटील



**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-धाराशिव शहरातील रस्त्यांचा रखडलेला प्रश्न आता निकाली निघाला आहे. निविदेतील २०२३-२४ च्या अंदाजपत्रकीय दरानेच ही सगळी कामे होणार आहेत. त्यामुळे आजच्या दराची तुलना केली असता सरकारचे अर्थात जनतेचे जवळपास साठ कोटी रुपये वाचणार आहेत. तुळजापूर आणि नळदुर्गबरोबरच हे काम सुरू झाले असते तर, कदाचित आत्तापर्यंत सत्तर टक्के काम पूर्णही झाले असते. आता कार्यारंभ आदेश झाले आहेत. लवकरच मुख्यमंत्री महोदय आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते धाराशिव शहरातील रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.**

प्रतिष्ठान भवन येथे शनिवारी या अनुषंगाने महत्त्वाची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शहरातील रस्त्यांच्या कामाचा प्रश्न आता निकाली निघाला असून लवकरच कामास सुरुवात होणार असल्याचे स्पष्ट केले. या कामांसाठी एकूण १८ महिन्यांची कालमर्यादा असली तरीही कालमर्यादेच्या आत ही सगळे रस्ते अगदी दर्जेदाररित्या पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी नमूद केले. राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री ना.श्री. एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना.श्री. अजितदादा पवार यांनी आपल्या पाठपुराव्याला मोठे बळ दिले आहे. त्यामुळे शहरातील रस्त्यांच्या कामाला आता प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. आपण स्वतः मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन धाराशिव येथील भूमिपूजन कार्यक्रमाचे निमंत्रण दिले आहे. तिन्ही मान्यवरांनी अनुमती दिलेली आहे. तारीख निश्चित झाल्यावर तातडीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहितीही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

महायुती सरकारच्या माध्यमातून मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी नेहमीच बळ दिले आहे. आपल्या धारशिव शहरासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून विशेष बाब म्हणून मोठ्या प्रमाणात विकास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून शहरातील रस्त्यांसाठी १४० कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब आणि नगरविकास मंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांनी विशेष बाब म्हणून धाराशिव शहरासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला. शहरातील रस्त्यांसाठी एवढा ऐतिहासिक निधी यापूर्वी कधीही मिळाला नव्हता. या निधीच्या माध्यमातून शहरातील रस्त्यांचे काम आता वेगात केले जाणार आहे. आपल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या विशेष सहकार्यातून तत्कालीन मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे यांनी १४० कोटी रूपयांच्या या विशेष प्रस्तावाला मंजुरी दिली होती. मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे, मा.श्री. अजितदादा पवार, पालकमंत्री प्रतापजी सरनाईक, संपर्कमंत्री जयकुमारजी गोरे साहेबांचेही यासाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे. वरील सर्वांचे सबंध धाराशिव शहरवासीयांच्या वतीने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मनःपूर्वक धन्यवादही मानले आहेत.

## तुळजापूर नगरपालिकेवर महाविकास आघाडीचा झेंडा फडकवणार





तुळजापूर(प्रतिनिधी)- तुळजापूर येथील लोहिया मंगल कार्यालयात तुळजा-पूर नगरपालिकेच्या निवडणुकीसंदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची माझ्यासह आमदार तथा जिल्हाप्रमुख कैलास दादा पाटील, धाराशिव जिल्हा सहसंपर्क प्रमुख नंदू भैय्या राजेनिंबाळकर,महिला आघाडी जिल्हा संघटक शामल (ताई) वडने,ऋषिकेश (भैय्या) मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली..! या बैठकीत येणारी तुळजापूर नगरपालिकेची निवडणूक महाविकास आघाडीच्या झेंड्याखाली लढविण्यात येणार आहे. आघाडीचा उमेदवार हा सर्वसामान्य, प्रामाणिक आणि जनतेच्या हिताचा विचार करणारा असेल. नागरिकांनी या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहून भ्रष्ट व्यवस्थेला हद्दपार करण्याची वेळ आता आली आहे.

अनेक वर्षांपासून तुळजापूर नगरपालिकेत सत्तेतून भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचारातून सत्ता - असा खेळ सुरू आहे. या व्यवस्थेमुळे शहरातील नागरिकांचे प्रश्न मागे पडले आहेत आणि अवैध धंद्यांना चालना मिळाली आहे. या सगळ्याचा फटका थेट सामान्य नागरिकांच्या आरोग्यावर आणि तरुण पिढीच्या भविष्यास बसत आहे. त्यामुळे आता परिवर्तनाची वेळ आली आहे. तुळजापूरकरांनी एकत्र येऊन महाविकास आघाडीच्या उमेदवाराला साथ द्यावी, भ्रष्ट सत्तेचा अंत करून तुळजापूरमध्ये स्वच्छ, प्रामाणिक आणि जनतेच्या हिताचे प्रशासन स्थापन करावे. यावेळी या वेळी उपस्थित जिल्हा समन्वयक शाम (भाऊ) पवार , माजी शहर प्रमुख सुधीर कदम, कमलाकर (काका) चव्हाण, शहर प्रमुख राहुल (भैय्या) खपले, शहर संघटक अर्जुन (आप्पा) साळूंके उप शहर प्रमुख बाळासाहेब शिंदे, बापु-साहेब नाईकवाडी,महिला आघाडी शहर संघटिका शोभा (ताई) शिंदे मिना ताई कांबळे,युवा सेना शहर प्रमुख, सागर (दादा) इंगळे, स्वरूभ कांबळे, महावीर कंदले,अनमोल साळुंके, सरदार सिंग ठाकूर, भरत (आप्पा) जाधव, विकास (पिनू)भोसले, नवनाथ (आप्पा) जगताप, उप तालुका प्रमुख रोहित चव्हाण, प्रेम कदम, प्रशांत उंडरे,मुरली जगताप ,मारुती जाधव, निलेश मगर, चिन्मय मगर, महेश लबडे, गौरीशंकर कौटगिरे, राज खपले, शंकर (चिंगु) शिंदे, पिंटू (मामा) जटाळ सर्वेश चव्हाण, सुरज लोले, बबन भोसले, अभिजीत कोरे, असंख्य शिवसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## महादेवा योजनेअंतर्गत १३ वर्षाखालील मुला-मुलींसाठी जिल्हास्तरीय फुटबॉल निवड चाचणी ३० ऑक्टोबरला

धाराशिव (प्रतिनिधी): महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA) यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने 'महादेवा' ही महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेद्वारे राज्यातील युवा खेळाडूंना फुटबॉल क्षेत्रात करिअर घडविण्यास प्रोत्साहन देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.या योजनेचा एक भाग म्हणून १३ वर्षाखालील मुला-मुलींसाठी जिल्हास्तरीय फुटबॉल निवड चाचणीचे आयोजन उपक्रम कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

ही निवड चाचणी दि.३० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुल, धाराशिव येथे पार पडणार आहे. जिल्ह्यातील सर्व शाळांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवावा आणि १३ वर्षाखालील विद्यार्थ्यांना फुटबॉल निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भ्रष्टाचार संपविण्याचा प्रयत्न केला पहिजे

ईश्वर सर्वव्यापक आहे तसे भ्रष्टाचारचे स्वरुप झाले आहे. अभाळ फाटल्यावर ढिगळ लावणे अशक्य तशी परिस्थिती भ्रष्टाचाराची आहे त्यामुळे नोकरशाहीतील भ्रष्टाचार संपण्याचे स्वप्न पाहणे सोडूनच दिलेले बरे. हा भ्रष्टाचार संपणारच नाही, निदान काही प्रमाणात नियंत्रित तरी होऊ शकेल याचीही आता हमी देता येत नाही. दर दोन-पाच दिवसांनी भ्रष्टाचाराचे एखादे गंभीर प्रकरण धक्कादायक पद्धतीने समोर येते. त्यातील छाप्यात मिळालेली रोकड आणि अन्य सामग्री पाहिली की डोळे पांढरे होण्याची वेळ येते. गेल्याच आठवड्यात अशाच दोन केसेस उघड झाल्या. यातील एक पंजाबमधील तर एक आसामच्या गुवाहाटीतील आहे. पंजाबमध्ये पोलीस महानिरीक्षकाचा प्रताप समोर आला आहे. भंगार व्यावसायिकाकडून यांनी आठ लाख रुपये लाच मागितली होती. बरे ती एकदाच मागितली नव्हती, तर दरमहा ही रक्कम हप्ता म्हणून ठरवली गेली होती. त्यात भुल्लर नावाचे हे महाशय गोत्यात आले. त्यांच्यासाठी वसुली करणाऱ्यालाही अटक करण्यात आली. साडेसात कोटी रोकड, स्थावर मालमत्तांचे ५० पेक्षा जास्त दस्तावेज, अनेक पॉश गाड्या आदी अगदी सुरुवातीच्या टप्प्यात उघड झाले आहे. अजून अंतर्गत तपासणी, बँक लॉकर वगैरे पाहणी व्हायची होती. विशेष म्हणजे भुत्तर महाशय राज्याचे माजी महासंचालक यांचे पुत्र आहेत. त्यामुळे ते खानदानी रईस आहेत. यात आता त्यांची भ्रष्टाचाराची संपत्ती किती आणि वडिलोपार्जित मिळालेली संपत्ती किती हा घोळ पुढे होईलच. आपल्याला कायद्याकडून न्याय मिळेल असा ठाम विश्वास महानिरीक्षकांनी व्यक्त केल्याची बातमी आहे. ज्या प्रकारे त्यांची वसुली सुरू होती त्यावरून त्यांना रोखणारे कोणीच नव्हते हे उघड आहे. त्यांना स्वतःला कशाचे भय नव्हते. आपणच कोतवाल असल्यावर भीती कोणाची असला हा मामला 'काय झाडी, काय डोंगर' या महाराष्ट्रातील सत्तांतर नाट्यातील गाजलेल्या गीतामुळे प्रसिद्धीस आलेल्या गुवाहाटीतही रस्ते बांधणी विभागातील अधिकाऱ्याने जमवलेली माया अशीच डोळे फिरवणारी. त्यांचे तीन-चार राज्यांत फ्लॅट अथवा घरे आहेत आणि दिल्ली परिसरातही ९ सदनिका असल्याची माहिती समोर आली. त्यांनीही बांधकामाच्या संदर्भात प्रमाणपत्रे देताना लाचेची मागणी केल्याचे बातम्यांमध्ये म्हटले आहे. जर अशा मागण्या करून आणि त्याद्वारे स्वतः लाभार्थी होऊन बांधकाम पूर्णत्वाची अथवा गुणवत्तेची प्रमाणपत्रे दिली जात असतील, तर बांधकाम सुरू असतानाच किवा बांधकाम पूर्ण झाल्याच्या काही महिन्यांनी पूल कोसळत असतील तर त्यात आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. लोकांचे जीव गेले तरी आपले घर भरले पाहिजे ही पैशाची हाव याच्या मुळाशी आहे. बहुतेक राज्यात गेल्या वर्षभरात बांधकाम पूर्ण झालेले आणि काही बांधकाम सुरू असलेले पूल कोसळले आहेत. त्याच्या बातम्या वर्षभर आपण पाहिल्या आहेत. त्यात काही शेकडा लोकांचे बळी गेले आहेत. त्यात पुढे केवळ त्या ठिकाणचे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कलगीतुरा रंगल्याचेच तेवढे दिसले. नंतर काय झाले हे सगळे पडद्यामागेच राहिले. अगदी दिवाळीच्या तोंडावर विषारी कफ सिरप पिल्याने २५ चिमुरड्यांचा मृत्यू झाला. गेलेली सर्व मुले सहा वर्षांच्या आतील होती. त्यांच्या पालकांचे दुःख ज्यांच्या भ्रष्टाचारामुळे हा प्रकार घडला ते कधीच समजू शकणार नाहीत. त्यांच्या डोळ्यावर भ्रष्टाचाराचा पडदा पडलेला आहे. केवळ बाबू अर्थात सरकारी कर्मचारीच भ्रष्टाचार करतात असे नाही तर राजकारण्यांपासूनच ते झिरपत खाली आहे. एकमेका सहाय्य करू या न्यायाने सगळी यंत्रणा चालते आणि त्यांनी ती पूर्ण पोखरून टाकली आहे. भ्रष्टाचार ही अत्यंत गंभीर समस्या असल्याचे आपण कित्येक दशकापासून ऐकतो आहोत. या विरोधात आमच्या सरकारचे धोरण शून्य सहिष्णुतेचे असल्याचे सत्ताधारीही सवयीने म्हणत असतात. 'गरिबी दूर करू' या नाऱ्यासारखाच भ्रष्टाचाराचाही नारा अंगवळणी पडला आहे. पुढे काही दिवसांतच किवा तासांतच त्यांच्याच कंपुतील एखाद्या महाभाग नेत्याचा भ्रष्टाचाराचा किवा होऊ घातलेल्या भ्रष्टाचाराचा नवा नमुना समोर येतो. त्यावरही निलाजरेपणाने 'आम्ही दूध का दूध पानी का पानी' करू वगैरे फिल्मी डायलॉग भ्रष्ट लोकांकडून ऐकवले जातात. या असल्या थेरांमुळे जगात देशाची आणि राज्याची किंवा आपण राहतो त्या शहराची किती नाचक्की होते याच्याशी भ्रष्टांना काही कर्तव्य नसते. त्यांना दिसत असतो तो केवळ पैसा आणि पैसा म्हणजे देव नाही, मात्र देवाची शपथ देवापेक्षा कमीही नाही असे संवाद ऐकवले जातात. पूर्वी परवाना पद्धत होती. नियमातून पळवाट काढून देण्यासाठी किंवा नसलेले काम नियमात बसवण्यासाठी भ्रष्टाचार व्हायचा असे म्हणतात. नियम जटील असल्यावरसुद्धा भ्रष्टाचाराला आमंत्रण मिळते असे म्हणतात. तथापि, आता नियमात असलेले काम मंजूर होण्यासाठीही पैसा द्यावा लागतो हे कारवाईनंतरच्या अनेक प्रकरणांची माहिती घेतल्यावर समोर आले आहे. नोकरशाहीकडे असलेले अधिकार, त्यांचा अपारदर्शकपणा, विवेकशून्यता आणि संवेदनहीनता ही भ्रष्टाचाराची मुळे आहेत. याची झळ ज्या पीडिताला बसते त्याची इतकी दमछाक झालेली असते की तो तक्रार करायलाच धजावत नाही. बरे त्याने तक्रार केलीच तर पुढे पळवाटा आणि चोरवाटाही अनेक असल्यामुळे कायद्यावर विश्वास असून कायदा आपल्याला न्याय देईल असे निर्लज्जपणे दोषी व्यक्तींकडूनच ऐकवले जाते. भ्रष्टाचार हा केवळ राजकीय अथवा प्रशासकीय क्षेत्रापुरता मर्यादित नाही. तो सर्वत्र पसरता आहे आणि खासगी क्षेत्रातही त्याचा शिरकाव झाला आहे. त्याचा देशातील प्रत्येक घटकावर प्रभाव पडल्याशिवाय राहत नाही. आर्थिक आणि सामाजिक विकासला तो बाधक आणि मारक ठरतो. कोणत्या क्षेत्रात भ्रष्टाचार आहे यावरून त्याचे गंभीर परिणाम काय होतील हे ठरत असते. भ्रष्टाचार हा देशाला लागलेली किड आहे ती एकट्या सरकारने किंवा व्यक्तीने संपणार नाही तर सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. काही झाले तरी भ्रष्टाचार संपविण्याचा संकल्प केला तर याला काही प्रमाणात पायबंद बसेल. भ्रष्टाचार संपविण्याचा सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे.

# प्रदूषणामुळे दमा रुग्णांना धोका

दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण असला तरी, अनेक आरोग्य तज्ज्ञांनी या सणादरम्यान होणार्या प्रचंड वायुप्रदूषणाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. विशेषतः दमा या श्वसनविकाराने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी दिवाळीतील फटाक्यांचा धूर जीवघेणा ठरू शकतो. दिवाळीच्या काळात प्रमुख शहरांत वायुप्रदूषण सामान्य दिवसांच्या तुलनेत तब्बल ४ ते ५ पटीने वाढते. याचा थेट धोका देशातील सुमारे ३.५ कोटी दमा रुग्णांना आहे. त्यामुळे दमा असलेल्यांनी फटाक्यांच्या धुरापासून दूर राहिले पाहिजे, असे तज्ज्ञ सांगतात.

दमा रुग्णांसाठी बचावाच्या टिप्स धुरापासून पूर्णपणे दूर राहा

दिवाळीत जास्तीत जास्त वेळ घरातच थांबा. खिडक्या आणि दारे बंद ठेवा, जेणेकरून बाहेरचा धूर आत येणार नाही. शक्य असल्यास प्रदूषणाची पातळी जास्त असलेल्या ठिकाणी प्रवास करणे टाळा. घराबाहेर पडल्यास ९५ किंवा ९९ सारख्या उच्च दर्जाचा मास्क वापरणे अनिवार्य आहे.

**औषधोपचार तयार ठेवा**

डॉक्टरांनी लिहून दिलेले सर्व आवश्यक औषधोपचार, विशेषतः तुमचा रिलीव्हर इनहेलर नेहमी सोबत ठेवा. इनहेलरचा वापर कसा करायचा, याची खात्री करा. तुमच्या दम्याच्या ॲक्शन प्लॅनचे पालन करा.


**परिसरातील हवा स्वच्छ ठेवा**

शक्य असल्यास घरात चांगल्या गुणवत्तेचा एअर प्युरिफायर वापरा. ज्यामुळे घरातील हवा शुद्ध राहील. दिवाळीत तेल किंवा तुपाचे दिवे वापरा. धूर करणारे अगरबत्ती किंवा धूप जाळणे टाळा.

**पावसाळ्यात का वाढतो दमा? । इतरांना करा आवाहन**

फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाबद्दल आपल्या कुटुंबातील सदस्य आणि मित्रांना माहिती द्या. पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबद्दल इतरांना प्रोत्साहित करा. आपल्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे.

# पचनाला पूरक पपई



पपई आजारपणातदेखील खाता येते. पिकलेल्या पपईत खनिजं, पोषक गुणधर्म आणि जीवनसत्त्वं मोठ्या मात्रेत उपलब्ध असतात. आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणं गरजेचं ठरतं, त्यासाठी पपई उपयुक्त! पपईमध्ये व्हिटामिन 'सी' व फायबर अर्थात तंतूमय घटकांचं प्रमाण भरपूर असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो.

अर्थातच कोलेस्टेरॉल साचल्याने संभवणारा हृदयविकाराचा धोका टाळण्यास पपईचे सेवन फायदेशीर ठरते. वजन कमी करणे किंवा नियंत्रणात ठेवणे यासाठी ज्या व्यक्ती प्रयत्नशील असतात, त्यांनाही पपईचा आहारात नियमित समावेश करण्याचा सल्ला दिला जातो.

पपईतील डाएटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणार्या भुकेवर नियंत्रण मिळवणं शक्य होतं. मानवी शरीरातील प्लीहा, यकृत रोगमुक्त ठेवणारे आणि काविळीसारख्या आजारांपासून मुक्ती देणारे हे फळ आहे.

अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास दूर करण्यासाठीही पपई उपयुक्त असल्याचे तज्ज्ञ सांगतात. पपई चवीला गोड असली तरीही पपईमुळे रक्तातली साखर वाढत नाही. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकर आहे.

पपई खाल्ल्याने मधुमेह चार हात लांब ठेवणेही शक्य होते. पपईमध्ये व्हिटामिन 'ए' मुबलक प्रमाणात आढळतं. डोळ्यांचं आरोग्य चांगलं राखण्यासाठी व्हिटामिन 'ए'अत्यंत गरजेचं आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी पपईचा आहारात समावेश करणं इष्ट!

पपईमध्ये वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांच्या दृष्टीने पपईचे सेवन फारच हितकारी मानले जाते. पपईतील घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसंच सूज कमी करण्यास मदत करतात. अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास पपई मदत करते तसंच ती पचनकार्यही सुधारते.

# पोटाचा कॅन्सर दूर करण्यासाठी गुणकारी फुलकोबी



फुलकोबी अर्थात फ्लॉवर कोणत्याही ऋतूत उपलब्ध होतो आणि असंख्य प्रकारच्या खाद्यपदार्थात सढळ हाताने वापरला जातो. अर्थात फक्त चविष्ट पदार्थ बनवता येतात म्हणून नाही; तर मानवी शरीराला उपयुक्त अशा अनेक गुणधर्मांमुळे फ्लॉवर अर्थात फुलकोबीचं आहारात महत्त्वाचं स्थान आहे. फायबर, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन बी ६ आणि फोलेट असे अनेक पोषक घटक फ्लॉवरमध्ये असतात. कॅल्शियम, फॉस्फरस, प्रोटिन, कार्बोहाईड्रेटस्, व्हिटॅमिन्स, आयोडिन, पोटॅशियम यांनी फ्लॉवर समृद्ध असतो. दाह-विरोधी गुणधर्मासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याच्या क्षमतेसाठी फ्लॉवर ओळखला जातो. फ्लॉवरमध्ये व्हिटॅमिन के असतं. त्यामुळे फ्लॉवर हा चयापचय, रक्तातील कॅल्शियम पातळीच्या नियंत्रणासाठी तसंच रक्त गोठण्यासाठी उपयुक्त ठरतो. फ्लॉवरमुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहण्यास मदत होते. फ्लॉवरमधलं फायबर आणि ओमेगा ३ ॲसिडमुळे 'बॅड कोलेस्ट्रॉल' कमी होण्यास हातभार लागतो.

फुलकोबी खाल्ल्याने हृदयरोग, मधुमेहाचा धोका कमी होतो. फ्लॉवरमध्ये भरपूर फायबर असतं. त्यामुळे नियमित खाल्ल्यास पचनास फायदा होतो. वजन कमी करायचं असेल आणि सहजपणे शरीर हायड्रेटेड ठेवायचं असेल तर फ्लॉवर खाणं फायद्याचं. आपल्यातल्या अनेकांना ठाऊक असेल की कोलीन हे पोषकतत्त्व मज्जासंस्थेच्या कार्यामध्ये आणि चयापचय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतं. फ्लॉवर खाल्ल्याने शरीरास कोलीनचा पुरवठा होतो. फ्लॉवर रक्त शुद्ध करण्यास हातभार लावतो.

त्याचबरोबर संसर्गापासून त्वचेचा बचाव करतो आणि सांधेदुखी, हाडांच्या दुखण्यावरही गुणकारी मानला जातो. पोटदुखी कमी करण्यासाठी आणि एकंदरच पचनक्रिया सुधारण्यासाठी तसंच सुरळीत राखण्यासाठी फ्लॉवर उपयुक्त ठरतो. शरीरातील विषद्रव्यं दूर करण्याबरोबरच पोटाचा अल्सर व पोटाचा कॅन्सर यापासून संरक्षण करण्यासाठी फ्लॉवर खाण्याचा सल्ला दिला जातो.

# शरीरात रक्त कमी असल्याची, निमियाची 'ही' लक्षणे दिसतात?



शरीरात रक्त कमी होण्याची समस्या महिलांमध्ये अधिक बघायला मिळते. याची कारणं वेगवेगळी असतात. जसे की, हार्मोन्समध्ये असंतुलन, पोषणाची कमतरता, मासिक पाळी इत्यादी. शरीरात रक्त कमी झालं तर सतत थकवा येणे, कमजोरी आणि चक्कर येणे अशा समस्या जाणवतात. रक्त कमी झाल्याने तुम्ही एनीमियाचे शिकार होऊ शकता. शरीरात हीमोग्लोबिनचं काम ऑक्सीजनचा पुरवठा करणं आहे. रक्तात हीमोग्लोबिनची कमतरता झाल्याने अनेक प्रकारच्या मानसिक आणि शारीरिक समस्या तुम्हाला शिकार बनवू शकतात.

हीमोग्लोबिन कमी होण्याची कारणं

रोजच्या आहारात आयर्नची कमतरता असल्याने हीमोग्लोबिन कमी होतं. महिलांमध्ये प्रेग्नेन्सीमुळे शरीरात हीमोग्लोबिनचं प्रमाण कमी होऊ शकतं. मासिक पाळी दरम्यान जास्त ब्लीडिंग याचं कारण ठरू शकते. जर शरीरात हीमोग्लोबिनची कमतरता असेल तर जंक फूडचं सेवन करणं बंद करा. व्हिटॅमिन आणि कॅल्शिअमच्या कमतरतेमुळेही ही समस्या होऊ शकते. त्यामुळे व्हिटॅमिन आणि कॅल्शिअम असलेले पदार्थ खावेत.

**शरीरात रक्त कमी होण्याची लक्षणं**

- फार जास्त थकवा जाणवणे, त्वचेवर पिवळेपणा येणे आणि कमजोरी जाणवणे हे हीमोग्लोबिन कमी असल्याचे संकेत आहेत. शरीरात रक्ताची कमतरता झाल्यावर हार्ट बीट वेगाने होण्याची समस्याही होऊ शकते. याने श्वास घेण्यास समस्या होऊ शकते.

- जेव्हा शरीरात रक्त कमी होतं तेव्हा ऑक्सीजनही कमी होऊ लागतं. याने तुम्हाला श्वास घेण्यास समस्या होऊ लागते. तसेच जडपणा जाणवू लागतो. ऑक्सीजन कमी झाल्याने शरीरात ब्लड सर्कुलेशनही कमी होऊ शकतं. याने इतरही काही समस्या होऊ शकतात.

- हीमोग्लोबिन कमी झाल्यावर डोकेदुखी आणि छातीत दुखण्याची समस्याही होऊ शकते. जेव्हा शरीरात हीमोग्लोबिनचं प्रमाण कमी होतं, तेव्हा तुम्हाला थकवा आणि कमजोरी जाणवू लागते. अशात तुम्ही कोणतंही छोटं काम करून लवकर थकाल.

- शरीरात रक्ताची कमतरता झाल्यावर -ींहीळींळी, कॅन्सर आणि किडनीसंबंधी आजारांचाही धोका वाढू शकतो.

**काय खावं?**

जर तुम्हा हीमोग्लोबिन कमी असण्याची समस्या असेल तर डेली डाएटमध्ये बदल करा. आयर्न असणारे पदार्थ अधिक खावीत. वेगवेगळ्या पालेभाज्या, गाजर, बीट यांचाही आहारात समावेश करा. तसेच व्हिटामिन सी ची कमतरता पूर्ण करण्यासाठी द्राक्ष, लिंबू, संत्री, आंबे, कीवी सारखे फळही खावीत. तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घ्यावेत.

# घरोघरी मुलं लठ्ठ का होत आहे? मुलांच्या आरोग्याची मोठी समस्या



आजकाल सर्वांमध्येच पण विशेषतः तरुण मुलांमध्ये आळस, कंटाळा, एकटेपणा, नैराश्य, लठ्ठपणा, निद्रानाश या काही समस्या वाढत आहेत. या समस्या नेमक्या ऐन तारुण्यात मुलांना का छळतात याची कारणं आधी पाहूया.१. तरुण मुलं उशिरा झोपतात, अनेकदा मध्यरात्री काहीतरी अनहेल्दी खातात, मग झोपतात. व्यायामाचा अभाव. मग दिवसा त्यांना आळस येतो. कष्ट नाही, त्यामुळे कुठलेही कष्टाचे कार्य करावेसे वाटत नाही, कमी कॅलरीज जळतात व त्याचे रूपांतर फॅट्समध्ये होतं. बिघडलेली दैनंदिन दिनचर्या हे एक महत्त्वाचं कारण आहे.

पालकांचे होणारे दुर्लक्ष. आई-बाबांना मुलांसाठी फार वेळ नसतो, ते नोकरी उद्योगात अडकलेले, आर्थिक गरजा मोठ्या. पालक आणि मुलांमध्ये सहवास आणि संवाद कमी. मुलांच्या आणि पालकांच्या वेळेचा मेळ बसत नाही. मुलांमध्ये एकटेपणाची भावना रुजू लागते. ३. मुलांकडे असलेला वेळेचा अभाव आणि शाळेच्या वेळा. पूर्वी मुले शाळेत जात तेव्हा शाळेच्या दोन सत्रांत मुले शाळेत जात असत व वेळेवर घरी आल्यामुळे क्लास, खेळणे, झोपणे इत्यादी सर्व क्रिया वेळेवर होत असत; परंतु आताचे शाळेचे वेळापत्रक मोठे. सकाळी शाळेसाठी निघालेली मुले सायंकाळीच चार वाजेला घरी येतात. प्रवासात वेळ जातो. मग अन्य क्लास, शिकवण्या मुलांकडे मोकळा वेळच नसतो. भरपूर मुलं खेळतात असं होतच नाही. जो वेळ उरतो तो स्क्रीन टाइम खाऊन टाकतो.

आमच्या न्यूजलेटरसाठी साईन-अप करा

परिणाम काय?

१. सध्या लठ्ठपणा ही समस्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे. युनिसेफच्या वर्ल्ड ओबेसिटी ॲटलिस्टच्या म्हणण्यानुसार भारतामध्ये २०३० पर्यंत लठ्ठ लोकांची संख्या २.७ कोटी एवढी असेल असा अंदाज वर्तवला जात आहे. (म्हणजेच दहापैकी एक मूल लठ्ठ असेल.)

२. भारत १८३ देशांमध्ये लठ्ठपणाच्या यादीत ९९ व्या स्थानावर आहे. अतिखाण्यामुळेच लठ्ठपणा वाढतो आहे असे नाही, तर अयोग्य अन्न आणि जे खाल्ले ते न पचवणे, सतत बसून, अथवा पडून राहणे, चुकीचे समज यामुळे हे प्रमाण वाढत आहे.

३. या लठ्ठपणावर त्वरित उपाय करणे गरजेचे आहे. कारण लठ्ठपणा आपल्यासोबत इतर अनेक समस्या घेऊन येतो.

४. नैराश्य, निद्रानाश, तेरा प्रकारचे कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसांचे विकार, टाइप टू डायबिटिस, फॅटी लिव्हर, गॉल स्टोन, महिलांमध्ये पॉलिसीस ओवरी, ब्रेन प्रॉब्लेम, हायपर टेन्शन, बीपी प्रॉब्लेम, किडनी प्रॉब्लेम आणि परिणामी कमी वयातील मृत्यू असे अनेक धोके आहेत.

५. त्यामुळेच संतुलित योग्य आहार काय असावा याचे प्राथमिक ज्ञान सर्वांना असणे गरजेचे आहे. त्यासोबतच शाळेतच बाकी शिक्षणासोबतच प्राथमिक दर्जाचे आरोग्य (फिटनेस) कसा राखायचा, हेही शिकवायला हवे.

६. लठ्ठपणावर उपाय शोधण्यासाठी शाळांची भूमिका फार महत्त्वाची असते. कारण शाळेत मुलांना खेळण्यासाठी मैदान असते. अर्थात कित्येक शाळांना मैदानेच नाहीत, तर थोडेफार मोकळे आवारही नाही. त्यांनी त्यावर उपाय शोधायला हवा.

७. अन्नातून माणसाला कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे, क्षार, मेद, तंतुमय या घटकांची पूर्तता होते; परंतु हे सर्व घटक प्रत्येकाच्या शरीरानुसार कोणते व किती प्रमाणात घ्यावेत याचा संतुलित मेळ बसवून घ्यावा लागतो. आहार योग्य वेळी घेऊन तो शारीरिक कष्ट अथवा हालचाली-व्यायाम करून पचवावा. झोपेच्या वेळाही पाळाव्या लागतात, म्हणून आपला बॉडी मास इंडेक्स कॅल्क्युलेट करून आहाराचे नियोजन करायला हवे.

**-डॉ. माया सौंदाणकर**

# अवैध मद्य विरोधी कारवाई

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत रामदास रा.हासेगाव के. ता.कळंब जि. धाराशिव हे दि.२४.१०.२०२५ रोजी कळंब ते येरमाळा जाणारे रोडलगतहॉटेल तुळजाई चे बाजूस अंदाजे ९६० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या.

यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

# निरोगी राहण्यासाठी

निरोगी राहण्यासाठी, नियमित व्यायाम करा, संतुलित आहार घ्या आणि भरपूर पाणी प्या. पुरेशी झोप घेणे, तणाव कमी करणे आणि स्वच्छता पाळणे देखील महत्त्वाचे आहे. शक्य असल्यास, मद्यपान टाळा आणि ताज्या, हलक्या जेवणाला प्राधान्य द्या. आहाराबद्दल टिप्स

संतुलित आहार घ्या: दररोज विविध प्रकारच्या फळे, भाज्या आणि संपूर्ण धान्यांचा आहारात समावेश करा.

पुरेसे पाणी प्या: साखरयुक्त पेये टाळा आणि दिवसातून भरपूर पाणी प्या.

प्रथिने खा: शक्य असल्यास वनस्पती-आधारित प्रथिने जसे की मसूर, बीन्स आणि नट्स खा. जास्त तिखट-मसालेदार पदार्थ



टाळा: हॉटेलमध्ये खाणे शक्यतो टाळा आणि पचायला हलका आहार घ्या.

भूकेनुसार जेवा: भूक असेल तेव्हाच खा आणि खाताना थोडी भूक शिल्लक ठेवून खा. जीवनशैलीबद्दल टिप्स

नियमित व्यायाम करा: व्यायामामुळे तुमची शारीरिक आणि मानसिक ताकद वाढते आणि स्नायू मजबूत होतात.

पुरेशी झोप घ्या:

# आरोग्यासाठी काळ्या की पिवळा मनुका आरोग्यासाठी फायदेशिर

पिवळ्या आणि काळ्या मनुका, आरोग्याला कोणत्या जास्त फायद्याच्या ?मुंबई : मनुका आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जातात. लोक अनेकदा सकाळी रात्री भिजवलेले मनुका खातात, ज्यामुळे अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात. मनुका दोन प्रकारचे असतात, पिवळे (सोनेरी) मनुका आणि काळे मनुका. बहुतेक लोक दोघांमधील फरकाबद्दल गोंधळलेले असतात. अनेकांना असा प्रश्न पडतो की दोघांपैकी कोणता जास्त फायदेशीर आहे.



तज्ज्ञ काय म्हणतात ?

पोषणतज्ज्ञ सांगतात की काळे आणि पिवळे मनुके आरोग्यासाठी चांगले आ- दोन्ही हेत. दोन्हीमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरचे प्रमाण चांगले असते. परंतु, काळ्या मनुक्यांमध्ये थोडे जास्त प्रमाण असते.

पिवळ्या मनुकांचे फायदे (सोनेरी मनुकांचे फायदे)

पिवळ्या किंवा सोनेरी मनुक्यांमध्ये सल्फर डायऑक्साइडने वाळवल्या जातात, त्यामुळे त्यांचा रंग हलका असतो. पो- षण-तज्ज्ञ दीपशिखा जैन यांच्या मते, ते थायरॉईड रुग्णांसाठी विशेषतः फायदेशीर आहेत. सकाळी रिकाम्या पोटी भिजवून खाल्ल्यास ते थायरॉईडची पातळी संतुलित करण्यास मदत करू शकतात.

काळ्या मनुकांचे फायदे

काळे मनुके हे लोहाचा एक उत्तम स्रोत आहे. जर एखाद्याला अशक्तपणाचा त्रास असेल तर दररोज ६-७ भिजवलेले काळे मनुके खाणे खूप फायदेशीर आहे. यामुळे शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढते आणि अशक्तपणा दूर होतो.

वजन कमी करण्यासाठी जर तुम्ही फिटनेस किंवा वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल, तर दोन्ही प्रकारचे मनुके तुमच्या आहारात समाविष्ट केले जाऊ शकतात.

ते नैसर्गिक गोडवा देणारे म्हणून काम करतात आणि साखरेची तल्लफ कमी करतात. ते त्वचेसाठी एक उत्कृष्ट अँटी-एजिंग फूड देखील आहेत, कारण त्यांचे अँटीऑक्सिडंट्स सुरकुत्या कमी करण्यास आणि तिला निरोगी चमक देण्यास मदत करतात. परंतु, वर नमूद केल्याप्रमाणे, काळ्या मनुक्यांमध्ये अँटीऑक्सिडंटचे प्रमाण थोडे जास्त असते, म्हणून ते खाणे चांगले. ते शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात, ज्यामुळे त्वचा चमकदार होते. तथापि, त्यांचे अनेक फायदे असूनही, मनुके मर्यादित प्रमाणात खा. तसेच, खाण्यापूर्वी ते भिजवा. दररोज ६ ते ८ मनुके पुरेसे आहेत.

# उपदेशकथा:परिस

एक माणूस नदीच्या काठी हातातल्या लोखंडीसाखळीला एकेक दगड घेऊन लावून पहात होता. त्याचा तो उद्योग बराच वेळ चालला होता. लोकांनी त्याला विचारले, हे तू काय करतो आहेस? तो उत्तरला परिसाचा शोध घेतोय.

संध्याकाळी लोकांनी पाहिले की त्याच्या हातातली साखळी सोन्याची झालेली होती व तरीही तो काठाला दगड शोधतच होता. लोकांनी त्याला पुन्हा विचारले, त्यावर तो म्हणाला, मला परिस सापडला होता. पण साखळीला दगड लावून फेकून द्यायच्या सवयीने मी तो परिसही फेकून दिला. तो आता पुन्हा शोधत आहे.

**कथा उपदेश :** *जीवनाचे सोने करणारा परिस फेकून देऊ नका.*




# व्यक्तिमत्त्व विकास

मोरपिस

: पूजा काळे

व्यक्तिमत्त्व विकासाच्या टप्प्यात साहित्याच्या योगदानाचा विषय महत्त्वाचा ठरतो. भाषा चळवळीद्वारे वैचारिक प्रगल्भतेतून समृद्धी स्त्रोताचा उगम होत असता, दुसरीकडे व्यक्तिमत्त्व विकासाच्या पायघड्या वाट पाहत असतात, ज्याच्या प्रभावाने आपल्या जीवनाचा ऊष:काल चिरायू होतो. जगभरात कुठल्याही भाषेचा प्रचार, प्रसार आणि संचार होण्याची मूळ कारण म्हणजे विकसित आणि वैकल्पिक तंत्रज्ञान होय. साहित्य क्षेत्रात आपल्या मराठी भाषेला सर्वोत्तम दर्जा प्राप्त झाला आहे. नामांकनाने तिच्या अस्तित्वाची जगमान्य मोहोर उठली आहे, ज्यात भाषेवरील शोध प्रबंध, त्याला लाभलेले रत्नजडित अलंकार, प्रतिमा, प्रतीक आणि विशेषणांचे बहुमोल संस्कार आहेत. यास्तव त्यावरील जतन, संवर्धनातून अति महत्त्वाच्या गोष्टी आपल्या प्रतीक्षेत आहेत. साहित्याची धुरा सांभाळणारा समाजातील मोठा घटक अर्थात पंडित, साहित्यिक, वैचारिक बैठकीतले दिग्गज जे भाषेला तिच्या साहित्याला पुढे नेण्याचं काम करतील. त्यातून कविता, कथा, कादंबऱ्या, ललित, व्यक्तीचारित्र्य विशेष संपादित साहित्य, पत्र-लेखन, ऐतिहासिक, सामाजिक आणि न्यायविषयक साहित्याची या न त्या कारणाने झालेली ओळख साथ करेल. साहित्य हे जीवनाचे दर्शन घडवणारे असल्याने ते माणसाच्या रंजनाचे, उद्बोधनाचे, मार्गदर्शनाचे प्रमुख साधन आहे. व्यक्तिमत्त्व विकासाच्या जडणघडणीत भाषेतल्या विविध साहित्याचा फार मोठा वाटा आहे. साहित्य हे कलेसाठी कला नसून जीवनासाठी मानणारे वि. स. खांडेकर म्हणतात की, पाणबुड्यांना उत्कृष्ट मोत्यांसाठी समुद्राचा तळ गाठावा लागतो, पण चांगल्या वाङ्.मयातले मोती नेहमी पृष्ठभागावर तरंगत असतात. साहित्य विषयावर होणारी जाणकारांची व्याख्याने, संवाद, भाषणे आपलं मनोधैर्य वाढवतात.

विचारधारेचं समर्थन करण्याची ताकद विशिष्ट साहित्यात असल्याने कुठल्याही व्यक्तिमत्त्वावर ती छाप पाडतात जी उत्तम दिशादर्शकाचे काम करतात. साहित्याची उंची छोटी अथवा मोठी नसते. ती प्रत्यक्ष जीवनरूपी आरशाचं काम करते. जीवनात साक्षात्कार घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम करताना मानवी हृदयावर सौंदर्याचे संस्कार कोरीत साहित्यातून कला जोपासली जाते. यालाच कलेतल्या साहित्याचा उगम असे म्हटले जाते. व्यक्तीवर घडणाऱ्या गोष्टींचा एखाद्या आसपास प्रभाव असतो. तो दिसतोही. म्हणजे वा बघा स्वत:चे समोरील




व्यक्तीचे अंतर्मन जाणण्यासाठी त्याचं कौशल्यपूर्ण बोलणं अतिशय तारक ठरतं, जे गोष्टी विकसित करण्यासाठी प्रत्यक्ष जीवनात साहित्यिक योगदान फळाला येतं. मानव जन्माला येताना शारीरिक वाढीसह मानसिक उन्नयन त्यायोगे व्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाची वाढ होते. व्यक्तीच्या जीवनातील पहिले ग्रंथालय म्हणजे त्याचे घर आणि जीवनातील पहिले वहिले साहित्यिक म्हणजे त्याचे आई आणि वडील होत. इथून पुढे प्रत्यक्ष जीवन प्रवासात साहित्यविषयक योगदानाचा प्रभावपडायला लागतो. घरात असलेली ज्येष्ठ मंडळी, आई, वडील आणि आनंद निर्मितीसाठी पूरक-पोषक असलेले वातावरण, याचा विचार हा पुढील बाजू भक्कम करतो. चारभिंती, खिडक्या, दारासह कुटुंबातील सदस्यांना पुढे नेणाऱ्या परंपरा, त्याला सुसंस्कृत आणि सुसंगत ठरणारे आचार, विचार, संस्कार या सगळ्या गोष्टींनी सुरू होतो प्रापंचिक साहित्य प्रवास. पुढे शालेय जीवनात विद्यार्थी रूपात गुरुशिष्याच्या नात्यामध्ये जडलेला व्यासंग. ज्ञानार्जनासाठीचे अध्ययन. पुस्तकांशी मैत्री होण्याच्या काळात मनावर कोरलेले संस्कार कायम रुजतात, जे मानवी मनात आनंद वृत्ती निर्माण करणारे ज्ञान, साहित्य, विद्या, विचार आत्मसात करताना दिसतात. मनन, वाचनाने संकलीत ज्ञान प्राप्त करण्याची सगळी दालनं खुली होतात. दरवेळी 'अभ्यासोनी प्रगटावे' चा जीवन मंत्र लक्षात घेता, आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार ठरू हे निश्चित होय. थोडसं धाडस दाखवून, कष्टाने, मेहनतीने मशागत होऊ लागली की कस्तुरीचा दरवळ आपसूक येऊ लागतो. व्यक्तिमत्त्व विकासाची पहिली पायरी अवघड नसली तरी विचारांचे कुंपण मजबूत असावे लागेल.

मोठ्या विचारवंतांची नाळ साहित्याशी जोडली असल्याने एका महान व्यक्तिमत्त्वाची उपाधी त्यांना सहज मिळते. त्यामागचा व्यासंग, प्रयत्नाची पराकाष्ठा पराकोटीची असते हे विसरून चालता कामा नये. हरेक वाचनाची फलश्रुती म्हणजे व्यक्तिमत्त्व विकासाची पायाभरणी होय. मनन, वाचन, संकलन यातून अभिव्यक्त होत जगणं आणि कृतिशील बनणं या व्यक्तिमत्त्व विकासाच्या उन्नत पायऱ्या आहेत. महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे जीवनात साहित्य अभ्यासामुळे आपल्यात स्वागतार्ह बदल घडतो. ज्यातून विकास घडतो. आगंतुकासारखी झालेली प्रगती आपल्या टप्प्याची दिशा ठरवते. आपलं मन आपणास एक पावती देते त्यावेळी अनंत परिश्रमात दडलेली प्रतिमा ही प्रतिभेच्या रूपात अवतरते. तेव्हा सत्य, शिव, सौंदर्य याचं संमेलन म्हणजे अवघे साहित्यविश्व संमेलन मानून व्यक्तिमत्त्व विकासाची कला सगळ्यांना अवगत होओ या शुभेच्छा. व्यक्तिमत्त्व विकासासाठी आपलं लेखन पुस्तक संचात, दिवाळी अंकात लेखन रूपाने बहरत राहो.

## डॉक्टर टिप्स

### तुम्ही डेमिसेक्शुअल (demisexual) तर नाही, जाणून घ्या याचे लक्षण

मागील काही वर्षांमध्ये सेक्शुएलिटीबद्दल लोक जास्त खुलून बोलू लागले आहे. आता या मुद्द्यांवर प्रत्येक व्यक्ती आपले विचार आणि आवड निवड व्यक्त करू लागला आहे. अलैंगिक, हा एक असा शब्द आहे ज्याबद्दल आतापर्यंत तुम्ही फारच कमी किंवा कदाचित ऐकले ही नसेल. यात ते लोक येतात ज्यांना सेक्सची इच्छा नसते किंवा जे रिलेशनशिपबगैर संबंध बनवण्यास तयार होऊन जातात आणि ते लोक मुलगी असो की मुलगा दोघांशी संबंध बनवण्यास तयार होऊन जातात.



**डेमिसेक्शुअल आणि अलैंगिकमध्ये काय फरक आहे?**

अलैंगिक लोकांना सहवास बिलकुल आवडत नाही आणि यांच्यात सहवास करण्याची इच्छाही जागृत होत नाही. तसेच दुसरीकडे डेमिसेक्शुअल व्यक्ती सहवासाठी फक्त त्याच लोकांप्रती उत्तेजित होतो ज्याच्याशी ते प्रेम करतात.

## विनोद




शिक्षक विद्यार्थ्यांना विचारतात, मला सांग, आई श्रेष्ठ की शिक्षक?

शिक्षक !

कारण आई एका वेळेस एकाच मुलाला झोपवते तर शिक्षक नीरस शिकवताना सर्व वर्गाला झोपवतात.

## संदेश

Fiza mein mehakti saam ho tum,
Pyaar mein jhalakta jaam ho tum
Aur kaya kahe janam tere bare me
Kharche ka dusra naam ho tum.

## सुविचार



नियतीवर...परमेश्वरावर कोणावर तरी विश्वास ठेवा!


**संस्कृत सुभाषित**

**धनेषु जीवितव्येषु स्त्रीषु भोजनकृत्तिषु।**
**अतृप्ता मानवा: सर्वे याता यास्यान्तिं यान्तिच ॥**

**अर्थ :** संपत्ती, जीवन, स्त्री आणि भोजन (यथास्थित) उपभोगून या सर्व बाबतीत मानव (माणसे) अतृप्तच राहून गेले (मेले) जातील आणि जातात (मरतील आणि मरतात).

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोडे क्र.१



## आडवे शब्द

१. कातीव दगड
३. नेहमी पटकन विसरणारा
६. वाडवडील
१०. आरडाओरडा, दंगा
१२. दोस्त
१३. व्याह्यांची बायको
१४. अयोध्येची नदी
१६. दाट, निबीड
१८. पृथ्वी
२०. उत्साह
२१. हे खाऊन रूप येते का?
२३. किडा
२५. वाईट सवय
२७. अस्थी
२९. अंत:करण
३१. पराक्रमी पुरुष
३२. आदरणीय
३३. दरवाजा
३५. कापड इ.चा पृष्ठभाग
३६. तृण
३८. आच, उष्णता
३९. घर
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा
४१. वरणाची दाळ
४२. निर्दय
४३. उद्यान
४४. जवळीक, मैत्री
४७. स्वीकृत, अंगीकृत
५०. अप्रिय, न आवडणारा
५१. सुळका
५१अ. अफवा, वदंता
५२. बालीश
५४. भगिनी
५५. पुष्कळ
५७. तंग
५८. क्रीडा
५९. वेखंड
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ
६१. बाण
६३. बंध
६४. विलंब
६५. टिंगल
६६. कायद्याला या हजार असतात!
६९. चकित नजर
७१. लाह्यांचा होम
७४. बासरी
७५. चुलता
७७. उणे
७८. न टाळण्याजोगे
७९. बरोबरीचा
८०. शर्विलक
८१. झेप
८३. घोडा
८४. पुष्पगुच्छ
८५. खेळातील चाल
८६. आईचा भाऊ
८७. गगन
८८. रहायला घर नसलेला

## उभे शब्द

१. दिवा (हिंदी)
२. वेडावाकडा
४. यज्ञातील सरपण
५. निशा
६. अस्तनी
७. नातवंडाचा मुलगा
८. राष्ट्र
९. वारा
१०. डिंक
११. ताजे, तरतरीत
१३. स्वच्छ, निर्मळ
१५. रूधिर
१७. फांदी
१९. सेपे
२२. डोंगर
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक
२६. धीर, बळ, उत्साह
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे
२९. बंदुकीची गोळी
३०. विश्व
३४. गंध, परिमळ
३५. एक 'बोलका' पक्षी
३७. रंग
३८. अटकसत्र
३९. कोडगा
४०. संसद सदस्य
४३. वक्रता
४५. मीठ
४६. वार्धक्य
४८. भेग
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा
४९. आगेकूच
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'
५२. पोळ्या करण्याचे साधन
५३. मिठी
५४. नोकर
५७. गृह
६१. लाज
६२. परिचय
६५. सूत कातण्याचे साधन
६७. आक्रोश
६८. हट्ट
७०. घट्ट दह्याची वडी
७२. अग्नी
७३. रगेल, माजखोर
७६. चोळीचा एक प्रकार
८१. पार्वती
८२. एक अप्सरा
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

## आडवे उत्तरे

१.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

## उभे उत्तरे

१.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हतारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ

# पोदार प्रेप धाराशिवमध्ये ‘दिवाळी फिएस्टा’ चा जल्लोष



धाराशिव (प्रतिनिधी)-पोदार प्रेप, धाराशिव येथे विद्यार्थ्यांसाठी रंगतदार *‘दिवाळी फिएस्टा’* चे आयोजन करण्यात आले. या खास दिवाळीपूर्व उपक्रमात विविध उत्साही क्रिया आणि आनंददायी क्षणांनी शाळा सजून गेली होती.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वाल्मिक सोमसे सर उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना आणि पालकांना दिवाळीच्या शुभेच्छा देत, सणांच्या माध्यमातून एकत्रित येण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात विविध *सर्जनशील कृती ठेवण्यात आल्या होत्या - ज्यात हस्तकला, रंगभरण, कागदाच्या पणत्या तयार करणे यासारख्या उपक्रमांचा समावेश होता. मुलांनी आनंदाने सहभाग घेतला.

विशेष आकर्षण ठरले सेल्फी कॉर्नर - पारंपरिक सजावटीत सजवलेला एक खास कोपरा, जिथे विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व पालकांनी सेल्फी घेत आनंदाचे क्षण टिपले.

दिवाळी फिएस्टा कार्यक्रमाने शाळेतील सणासुदीचा उत्साह द्विगुणित केला आणि सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाची उजळण झाली.

# अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडील समस्यांबाबत छावा संघटनेचे मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन



धाराशिव (प्रतिनिधी)- अण्णासाहेब पाटील अर्थिक मागास विकास महामंडळाकडून कर्ज घेतलेल्या उद्योजकांना व्याज परतावा वेळेवर द्यावा तसेच नवीन उद्योजकांना पोर्टल बंद असल्यामुळे नोंदणी करता येत नाही. या समस्या दूर करून नवउद्योजकांसमोरील अडचणी दूर कराव्या अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मराठा समाजातील उद्यो-ग करू पाहणारे जे मराठा युवक या महामंडळांतर्गत जे उद्योजक बनले आहेत त्यांना व्याज परतावा वेळेवर मिळत नाही. नवीन बनू पाहणार्या युवकांना सदरील पोर्टल बंद असल्याने नोंदणी करता येत नाही. सदरील योजनेचा लाभ मिळण्यासाठी बँकाकडून टाळाटाळ केली जात असल्याच्या देखील तक्रारी आहेत. त्यामुळे महामंडळाकडून येत असलेल्या अडचणी दूर करून मराठा युवकांना न्याय मिळावा अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मराठा आरक्षण समिती उपाध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांना देखील हे निवेदन देण्यात आले आहे. यावेळी मराठा युवकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजीही केली.

या वेळी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ साळुंके, जिल्हा सचिव जोतिराम काळे, अण्णासाहेव पाटील फाऊंडेशन अध्यक्ष खंडू राऊत, मराठा समन्व्यक अक्षय नाईकवाडी, शिवराज्यभिषेक सोहळा समितीचे दत्तात्रय साळुंके तसेच या महामंडळ अंतर्गत येणारे लाभार्थी, मराठा समाजातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव येथे मंगळवारी भव्य नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळावा

धाराशिव (प्रतिनिधी)- सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी धाराशिव येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. २८ ऑक्टोंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत पुष्पक मंगल कार्यालयात हा मेळावा होणार असल्याची माहिती आयोजक तथा भाजपाचे युवा नेते शंतनू पायाळ यांनी दिली.

या नोकरी महोत्सवात पाचवी ते पदवीधर उमेदवारांना शैक्षणिक पात्रतेनुसार विविध कंपन्यामध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. नोकरी महोत्सवात भारतीय जनता पार्टीचे विविध पदाधिकारी, नेते तसेच विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यासाठी इच्छुक उमेदवारांनी https://shantanupayal.jobfairindia.in या लिंकवर ऑनलाईन नोंदणी करून नोकरीच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही आयोजक शंतनू पायाळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९०७६२००५५१, ९०७६२००५५२ व ९०७६२००५५३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

# प्रा.अरुणा गंगाराम पोटे यांचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल धाराशिव येथे सत्कार



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील शासकीय विश्रामगृहात प्रा.अरुणा गंगाराम पोटे यांना मुक्ता साळवे राष्ट्रीय आदर्श शिक्षिका पुरस्कार बीड येथे प्रा.डॉ.रमेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्लिश एज्युकेटर सोसायटीच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये मिळाल्याबद्दल बहुजन रयत परिषद आणि लहुजी शक्ती सेनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा.अरुणा पोटे म्हणाल्या की, मुक्ता साळवे यांच्या नावाने मला राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला आहे.हे मी माझे भाग्य समजते. मुक्ता साळवे यांनी बहुजनांच्या दुःखांविषयी निबंध लिहून नेमका आमचा धर्म कोणता आहे ? हा सरकारला प्रश्न वयाच्या चौदाव्या वर्षी विचारलेला होता. आणि त्यांनी जातीअंतासाठी प्रयत्न केला होता.या महान व्यक्तीच्या नावाने पुरस्कार मिळाल्यामुळे मी कृतज्ञ झाले आहे असे त्या म्हणाल्या.

यावेळी त्यांनी सत्काराबद्दल बहुजन रयत परिषद आणि लहुजी शक्ती सेना या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश प्रवक्ता प्रा.डॉ.मारुती अभिमान लोंढे यांनी केले.तर आभार बहुजन रयत परिषदेचे जिल्हा अध्यक्ष योगेश येडाळे यांनी मानले.

याप्रसंगी बहुजन रयत परिषदेच्या महिला जिल्हाध्यक्ष मीना धावारे, पदाधिकारी आम्रपाली माने, लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा कार्याध्यक्ष संतोष मोरे आदिसह मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते उपस्थित होते.

# बस स्थानकाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल ॲड. तुकाराम शिंदे यांचा ढोकी ग्रामस्थांच्यावतीने सत्कार



ढोकी (प्रतिनिधी)-ढोकी येथील अत्याधुनिक बसस्थानकाचे बांधकाम सुरू करण्याचे आदेश महाराष्ट्राचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाघ यांना दिले आहेत. त्यामुळे ढोकीच्या बांधकामाचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याबद्दल बस स्थानकासाठी यशस्वी पाठपुरावा करणारे शिवसेनेचे राज्य आंदोलन समन्वयक ॲड. तुकाराम शिंदे यांचा ढोकी ग्रामस्थांच्या वतीने शाल, फेटा व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.

यापूर्वी ढोकी येथे ग्रामीण रुग्णालय आणि आता बस बस स्थानकासाठी देखील पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावल्याबद्दल ॲड. तुकाराम शिंदे यांचा हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, भारतीय जनता पार्टीचे नेते देशमुख, माजी सरपंच तथा भारतीय जनता पार्टीचे नेते गब्बर काझी, राष्ट्रवादीचे तालुकाप्रमुख दौलती गाढवे, परिवार ग्रुपचे तालुकाध्यक्ष सतीश (पप्पू) वाकुरे, ग्रामपंचायतचे माजी सदस्य उमेश माळी, प्रमोद कदम, श्रीराम सोमानी, पवन सोमानी, शिवसेनेचे नेते भारत देशमुख, भारतीय जनता पार्टीचे तालुक्याचे नेते सिराजभाई मुल्ला, प्रभाकर गाढवे, शिवसेना शहरप्रमुख पंकज देशपांडे , शिवसेना कामगार सेनेचे जिल्हाप्रमुख अरुण डोलारे, गफ्फार काजी, प्रमोद देशमुख यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाशीच्या आखाड्यात गावडेंनी मारली बाजी: भाऊबीज निमित्त कुस्ती स्पर्धा आयोजन करण्याची शेकडो वर्षांची परंपरा कायम



वाशी(प्रतिनिधी)-येथील पारंपरिक कुस्ती स्पर्धेत निमगावात येथील पैलवान अविनाश गावडे याने मानाची शेवटची कुस्ती जिंकत बाजी मारली.या आखाड्यात तालुक्यातील तेरखेडा, पारगाव, रुई यासह भूम, परंडा, कळंब, कुर्डुवाडी, करमाळा यासह राज्याच्या अनेक भागातून आलेल्या कुस्ती पटुंनी सहभाग घेतला होता. दुपारी ३ वाजता सुरू झालेल्या या आखाड्यात अनेक राज्यस्तरीय स्पर्धा जिंकलेल्या मल्लांनी आपली मैदानी कसब दाखवली. दिवाळीच्या भाऊबीजेला कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्याची शहराची शेकडो वर्षाची परंपरा आहे. गुरुवारी झालेल्या या आखाड्यात १०० कुस्त्या घेण्यात आल्या ज्यासाठी लाखो रुपयांची रोख बक्षिसे वाटप करण्यात आली.

शहरातील अनेकांनी आपल्या कुटुंबातील पूर्वजांच्या नावे नामवंत पैलवानाच्या लढती लढवल्या. पुर्वीपासून या ठिकाणी शेवटची मानाची कुस्ती ही शिवशक्ती शेतकरी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन पंडित चेडे यांची असते. ही मानाची लढत निमगाव येथील अविनाश गावडे व कडा आष्टी येथील मनोज पवार यांच्यात झाली. आखाड्यातील डावपेचांनी रंगलेल्या या लढतीत निमगावच्या अविनाश गावडे यांनी बाजी मारली. विजयी कुस्तीपटूला बक्षिसाचे वितरण जय हनुमान तालीम संघाचे पदाधिकारी, पंचमंडळी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भारत मोळवणे, शिवाजीराव सांडसे, माजी नगराध्यक्ष नितीन चेडे, नागनाथ नाईकवाडी, विकास मोळवणे, छगनगराव मोळवणे, जीवन कुंभार, दादासाहेब चेडे, गाढवे सर, रत्नाकर उंदरे, बाळासाहेब शेरकर, बालाजी कवडे, यांच्यासह आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना श्रद्धांजली

मुंबई,(प्रतिनिधी)- चतुरस्त्र अभिनेते म्हणून सतीश शाह यांनी सिने, नाट्यसृष्टीत आपला वेगळा असा अमिट ठसा उमटविला आहे. सहज-सुंदर अभिनायातून साकारलेल्या भूमिकांच्या रुपांमध्ये ते रसिकांच्या मनांत चिरंतन राहतील, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

सतीश शाह यांनी चित्रपट सृष्टी, रंगभूमी आणि दूरचित्रवाणी या तीनही माध्यमांत काम करताना रसिकांची दाद मिळवली. विनोदी, सहज-सुंदर, निखळ मनोरंजनात्मक भूमिका ते चरित्र अभिनेता अशी त्यांची वाटचाल राहीली. निखळ आणि भूमिकांना न्याय देणारा प्रामाणिक अभिनेता म्हणून त्यांची ओळख होती. मराठी चित्रपट सृष्टीच्या गौरवात भर घालणाऱ्या स्व. दादा कोंडके यांच्या चित्रपटात त्यांनी भूमिका वठवून मराठी रसिकांचीही दाद मिळवली. शाह यांच्या निधनामुळे कला क्षेत्राची हानी झाली आहे.

या क्षेत्रातील पिढ्यांना जोडणारा एक मार्गदर्शक दुवा निखळला आहे. शाह यांच्या कुटुंबियांच्या आणि त्यांच्या चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, या सर्वांना हा आघात सहन करण्याची ताकद मिळो, अशी प्रार्थना करून, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# बिरुदेव मंदिर देवस्थान यात्रोत्सव हजारो भाविकांच्या उपस्थितीत साजरा

## 'येळकोट येळकोट जय मल्हार' घोषात निघाली श्री बिरोबाची पालखी मिरवणूक

**उमरगा/प्रतिनिधी :** कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा व महाराष्ट्रातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या उमरगा-लातूर मार्गावरील श्री क्षेत्र बिरुदेव मंदिराच्या वार्षिक यात्रोत्सवात यावर्षी भाविकांची अभूतपूर्व गर्दी झाली. मंगळवारी (दि. २१) सायंकाळी धनगर वाड्यातून श्री बिरोबाच्या पालखी मिरवणुकीला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. ढोल-ताशांचा गजर, भंडाऱ्याची उधळण आणि येळकोट येळकोट जय मल्हारच्या जयघोषात हजारो भाविक सहभागी झाले होते. यापूर्वी सोमवारी (दि. २०) सायंकाळी मंदिरातून निघालेल्या पालख्यांनी ग्रामदैवत महादेव मंदिरास भेट दिली व धनगरवाड्यातील लक्ष्मी मंदिरात मुक्काम केला होता.

बुधवारी (दि. २२) पाडवा सणानिमित्त दुपारी काठी व पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पालखी वेशीत पोहोचल्यावर मानकरी विजय पाटील यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर पालख्यांनी महादेव मंदिराला भेट दिली.या यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी श्री बिरुदेव मंदिर देवस्थान समितीचे जालिंदर सोनटक्के, बालाजी दिनकर घोडके, प्रदीप घोडके, माजी नगरसेवक मधुकर घोडके, गोविंद, संभाजी, दिलीप, धनराज घोडके, सुनील सोनटक्के, तुकाराम बिराजदार, सुभाष अष्टगे यांसह सर्व पदाधिकारी व पुजारी बांधवांनी परिश्रम घेतले.

आईवडिलांची सेवा हाच खरा धर्म होय पुजारी जयराम म्हेत्रे-सोनटक्के व भास्कर घोडके यांनी पारंपरिक पिक-पाणी भविष्यवाणी सांगत समाजाला मोलाचा संदेश दिला. आई-वडिलांची सेवा, माणुसकी व सेवाभाव जपणे हा खरा धर्म आहे; बुधवारी रात्री विजापूरहून आलेल्या बाशिंग श्री बिरोबाला चढवण्याचा भव्य सोहळा पार पडला. तर गुरुवारी (दि. २३) पहाटे छबिना व काठी मिरवणुकीत हजारो भक्तभाविक सहभागी झाले.



# श्री कीर्ती किरण पुजार यांनी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवीजींचे घेतले दर्शन



धाराशिव (प्रतिनिधी)- दि. २२ ऑक्टोबर २०२५ रोजी दिवाळी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर धाराशिव जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान श्री कीर्ती किरण पुजार सर यांनी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवीजींचे दर्शन घेतले.

दीपावली पाडव्या निमित्ताने मंदिर परिसर दिव्यांच्या प्रकाशाने लखलखून गेला होता. मंदिर परिसरात आकर्षक आणि सुंदर रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती. दर्शनावेळी भक्तीभाव आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# माजी सैनिकांसाठी पेंशन व शासकीय योजनांबाबत मेळावा – २५ ऑक्टोबर रोजी अहमदनगर येथे आयोजन

धाराशिव (प्रतिनिधी): जिल्ह्यातील माजी सैनिक, वीरनारी, वीरपिता तसेच सर्व वयोवृद्ध सैनिकांसाठी पेंशन व 'स्पर्श' संबंधित अडचणींचे निराकरण करण्यासाठी विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा मेळावा २५ ऑक्टोबर २०२५ रोजी मेकॅनाईज इन्फंट्री सेंटर अँड स्कूल,अहमदनगर (अहिल्यानगर) येथील स्टेडियमवर सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे.

या मेळाव्यात पेंशन तसेच 'स्पर्श' योजनेशी संबंधित शंका व अडचणींचे निरसन करण्यात येईल. तसेच विविध शासकीय योजनांची माहिती आणि मार्गदर्शन प्रधान नियंत्रक रक्षा लेखा कार्यालय,प्रयागराज येथील अधिकाऱ्यांमार्फत दिले जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व सेवानिवृत्त सैनिक अधिकारी,माजी सैनिक,वीरनारी, वीरपिता आणि वयोवृद्ध सैनिकांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.) यांनी केले आहे. इच्छुक माजी सैनिक, त्यांची पत्नी, वीरनारी, विधवा पत्नी किंवा पाल्य यांनी आपली नावे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धाराशिव येथे संपर्क करून नोंदवावीत.अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२५५७ किंवा ७५८८५२७५५४ वर संपर्क साधावा.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# १५ मिनिटांत तुळजापूर महामार्गावर २ दरोडे कट्ट्याच्या धाकावर भाविकांना लुटले




तुळजापूर (जि. धाराशिव) : तुळजाभवानी आणि विठ्ठलाच्या दर्शनासाठी ये-जा करणाऱ्या भाविकांच्या दोन कारवर २५ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी हल्ला करून दरोडा टाकल्याची थरारक घटना घडली आहे. अवघ्या १५ मिनिटांच्या फरकाने तुळजापूर-सोलापूर महामार्गावर दोन ठिकाणी दरोडा टाकण्यात आला. चोरट्यांनी चाकू आणि कट्टासदृश वस्तूचा धाक दाखवून सोनं, रोकड आणि मोबाइल असा एकूण २ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या हल्ल्यात एका भाविकाला गंभीर दुखापत झाली असून, परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

पहिली घटना पहाटे ३:१५ वाजता सिंदफळनजीकच्या सर्व्हिस रस्त्यावर घडली. सातारा जिल्ह्यातील संदीप रघुनाथ आटोळे हे कुटुंबासह तुळजाभवानीच्या दर्शनासाठी जात असताना, गाडी थांबवली असता दोन मोटारसायकलवरील चार चोरट्यांनी चाकू-कट्ट्याचा धाक दाखवला. त्यांनी महिलांच्या गळ्यातील १ लाख ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लुटले. या घटनेनंतर अवघ्या १५ मिनिटांत, म्हणजेच पहाटे ३:३० वाजता सोलापूर महामार्गावर 'हॉटेल राजगड'समोर दुसरी घटना घडली. निलंगा (जि. लातूर) येथील सतीश वीरनाथ बिडवे हे कुटुंबासह पंढरपूरला जात असताना गाडी थांबवल्यावर चार चोरट्यांनी त्यांना लुटले. विरोध केल्याने चोरट्यांनी बिडवे यांच्यावर चाकूने वार करून आणि ठोसा मारून त्यांना जखमी केले. या दरोड्यात ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला गेला. सतीश विरनाथ बिडवे यांच्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलिस ठाण्यात चार अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०९(६) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

विशेष पथके रवाना

पोलिसांनी तपासासाठी विशेष पथके नेमली आहेत आणि सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. दोन्ही घटनांतील चोरट्यांचे वर्णन सारखे असल्याने ही एकाच टोळीची कारवाई असल्याचा पोलिसांना संशय आहे. यापूर्वी २० ऑक्टोबर रोजी झालेल्या दरोड्याचा तपास लागलेला नसतानाच, या सलग घटनांमुळे महामार्गावरील गस्त वाढवण्याची मागणी प्रवाशांतून होत आहे.

# श्वेता दुरुगकर यांचा शिवसेनेत जाहिर प्रवेश

## स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पक्षाची ताकद वाढणार



धाराशिव (प्रतिनिधी)- - येथील धडाडीच्या राष्ट्रवादी काँग्रेस युवती जिल्हाअध्यक्ष सौ.श्वेता ताई सागर दुरुगकर यांनी शिवसेनेत (उध्दव बाळासाहेब ठाकरे) जाहिर प्रवेश केला आहे.

खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आमदार कैलास पाटील यांनी त्यांचे शिवसेनेत स्वागत केले. युवती नेत्या सौ.श्वेता ताई सागर दुरुगकर यांचे सामाजिक क्षेत्रत तसेच युवतीसाठी मोठे काम आहे. त्यांनी वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत भगव्या विचारांनी प्रेरित होऊन, पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात काम करण्यासाठी, जिल्हासंपर्कप्रमुख सुनील काटमोरे, सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत (उध्दव बाळासाहेब ठाकरे) जाहिर प्रवेश केला. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या संपर्ककार्यालयात झालेल्या कार्यक्रमात खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार कैलास पाटील यांनी पुष्पगुच्छ देवून श्वेता सागर दुरुगकर यांचे स्वागत केले.

शिवसेनेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील सर्वसामान्यांचे प्रश्न आपण सोडवाल आणि हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचऊन शिवसेना संघटना बळकट कराल असा विश्वास यावेळी खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी महिला आघाडी जिल्हा संघटक शामलताई वडणे, जिल्हा समन्वयक दिनेश बंडगर, शहरप्रमुख सोमनाथ गुरव, रोहित निंबाळकर, तुषार निंबाळकर, मनीषाताई वाघमारे, पंकज पाटील, अभिजित देशमुख, मंगेश निंबाळकर, सागर दुरुगकार, प्रतीक निंबाळकर, अभिजीत निंबाळकर, सह्याद्री राजेनिंबाळकर, हर्षद ठवरे, सात्विक दंडनाईक, बंडू आदरकर, गणेश असलेकर, सुधीर आलकुंठे आदी मान्यवर उपस्थित होते.


**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **ATURAO PRABHAKAR CHIKSHE**
TO: **ATULRAO PRABHAKARRAO CHIKSHE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **ATULRAO PRABHAKAR CHIKSHE** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **ATULRAO PRABHAKAR CHIKSHE**
NEW NAME :- **ATULRAO PRABHAKARRAO CHIKSHE**
Address -27/132 Shram Safallya Siddhivinayak Mandir Anand Nagar Osmanabad DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-866367799397 Mob.8766566709



**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव**
**ई-निविदा सूचना क्र. ०६ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव (दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२८८२/८३) हे योग्य त्या कंत्राटदार यांचेकडून ऑनलाईन निविदा मागवित आहेत.

वेबसाईट:-https://mahatenders.gov.in व
https://pwd.maharashtra.gov.in

स्वाक्षरित/-
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

आरओसी-२०२५-२६/क्र.-५/सी३४८२



हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649